G.Drive Backup:\RM Correspondance /Genral Correspondance Letter (Repaired)


**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad – 431 004, Maharashtra, India**
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत.**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)


संदर्भ क्र. : शैक्ष/ संलग्न/ २०२१-२२/७६९५-७८ | दिनांक:- २७-०९-२०२१.

**प्रति,**
**प्राचार्य,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**विषय:- CAS योजनेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या शिबारामध्ये संस्थेचे अध्यक्ष / सचिव किंवा त्यांचे प्रतीनिधी व प्राचार्यांनी उपस्थित राहणे बाबत.**

**संदर्भ:-** १) विद्यापीठ अधिसभे मध्ये दि. २८ डिसेंबर, २०२० रोजी झालेली चर्चा.
२) मा. सहसंचालक उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग यांनी अधिसभेमध्ये उपस्थित केलेला प्रश्न दि.२८ डिसेंबर, २०२०.
३) शासनाचे परिपत्रक दि. ०८ जुलै, २०१९.

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, CAS योजने अंतर्गत शासनाचे परिपत्रक दि. ०८ जुलै, २०१९ अन्वये विनिर्धिष्ठित केल्यानुसार अनुक्रमे उस्मानाबाद जिल्ह्यासाठी विद्यापीठ उपकेंद्र उस्मानाबाद दि. २८-०९-२०२१, बीड जिल्ह्यासाठी बलभीम महाविद्यालय बीड दि. २९-०९-२०२१, जालना जिल्ह्यासाठी जे.ई.एस. महाविद्यालय जालना दि. ३०-०९-२०२१, औरंगाबाद जिल्ह्यासाठी (शहर व ग्रामिण) विद्यापीठाचे मुख्य नाट्यगृह, विद्यापीठ परिसर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद दि.०१ व ०३-१०-२०२१ रोजी शिबिर आयोजीत करण्यात आलेले असून, आपणास विनंती करण्यात येते की, सदरील शिबिरामध्ये महाविद्यालयाच्या व्यवस्थपनाचे अध्यक्ष / सचिव किंवा त्यांचे प्रतिनिधी तसेच संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी उपस्थित राहणे अत्यावश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा. सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी अधिसभेमध्ये दि. २८ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाला दिलेल्या माहितनुसार व झालेल्या चर्चेप्रमाणे कादेशिरदृष्ट्या सर्व संबंधित अध्यापकांना मान्यता देताना किंवा वेतन निश्चित करतांना तांत्रीक अडचण निर्माण होऊनये म्हणुन किंवा सदरील मान्यता बेकायदेशिर ठरवू नये म्हणून महाविद्यालयीन संस्थेच्या व्यवस्थपाणाचे अध्यक्ष / सचिव किंवा त्यांचे प्रतिनिधि तसेच संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना CAS योजने अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या मुलाखातीसाठी उपस्थित राहणे अनिर्वाय आहे. याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी तद्अनुषंगाने उक्त प्रकरणी उपस्थिती बाबत मा. सहसंचालक यांच्या कर्यालयाकडून किंवा शासनस्तरावरुन मान्यते बाबत तांत्रीक अडचण निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधितांवर राहील. तसेच तद्अनुषंगाने यापुढे भविष्यात CAS योजने अंतर्गत संपन्न होणाऱ्या शिबीरात संस्थेचे अध्यक्ष / सचिव किंवा त्यांचे प्रतिनिधी मुलाखातीस उपस्थित राहणे अनिवार्य राहील याचीही कृपया नोंद घ्येण्यात यावी.

स्वाक्षरित
**उपकुलसचिव,**
(शैक्षणिक विभाग)

**प्रतिलिपी:-**

१) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.

२) संस्था अध्यक्ष / सचिव, सर्व संलग्नीत महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.

३) मा. संचालक, युनिक विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देण्यात येऊन विनंती करण्यात येते की, सदर पत्र सर्व संलग्नीत महाविद्यालयांच्या ई पत्यावर पाठविण्यात यावे.

**उपकुलसचिव,**
(शैक्षणिक विभाग)